**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४१/२०१९** **दिनांक २१/०५/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. अशोककुमार चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२३७३३९६ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १५/०५/२०१९ ते २१/०५/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून २६/०५/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५/०५ | १६/०५ | १७/०५ | १८/०५ | १९/०५ | २०/०५ | २१/०५ | | २२/०५ | २३/०५ | २४/०५ | २५/०५ | २६/०५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३१ | ३१ | ३० | ३० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २६ | २६ | २६ | २६ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | ० | १ | १ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८१ | ९४ | ९३ | ९३ | ९३ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३४ | ३६ | ३६ | ३८ | ४२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ००४ | ००३ | ००३ | ००२ | ००२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा. | आ.पू. | द. | आ. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २२ ते २६ मे, २०१९ पर्यंत आकाश निरभ्र राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये सौम्य कोरडी स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **पक्वता** | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी ‘वैभव” विळ्याने जमिनीलगत कापणी करून मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| **खरीप भात** | **रोपवाटीका पूर्वतयारी** | • भात रोपवाटीकेसाठी गादी वाफे तयार करावेत. प्रथम जमीन नांगरून ढेकळे फोडावीत आणि प्रती चौरस मीटर १ किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बियाण्यांची तसेच रासायनिक आणि सेंद्रिय खताची साठवण करावी. |
| **आंबा** | **फलधारणा अवस्था** | • काढणी योग्य फळांची काढणी ‘नूतन’ झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर त्वरीत करावी. यामुळे फळामधील साक्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले “रक्षक फळमाशी सापळा” प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी. |
| **आंबा व काजू** | - | • तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, नवीन लागवड केलेल्या आंबा व काजू कलमांना ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा. |
| **सुपारी** | - | • तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• दक्षिण दिशेकडील उन्हापासून सुपारीच्या खोडाचे संरक्षण करण्यासाठी खोडावर गवत पेंढा किंवा सुपारीची झावळी बांधावी. |
| **नारळ** | - | • तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या आर्द्रतेत होणारी घट यामुळे, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | | • खरीप हंगामासाठी वांगी, मिरची आणि टोमेटो भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून पाण्याची उपलब्धता असल्यास भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रती किलो प्रमाणे थायरम बुरशीनाशक चोळावे.तसेच रोपांचे मर रोगापासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी.<br>• तापमानात होणारी वाढ आणि दुपारच्या होणारी घट यामुळे, फळबाग रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. जनावरांना उन्हाच्या वेळेत चरावयास सोडू नये तसेच जनावरांना सावलीत बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• कुकुटपालन शेडमध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**